भारतीय पृथ्वि विज्ञान मंत्रालय, भारतीय हवामान शास्त्र विभाग आणि
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली सहयोगीत

# -: ग्रामिण कृषि मौसम सेवा प्रकल्प :-

उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला पत्रक - सिंधुदुर्ग

कालावधी (दिनांक ०१.०५.२०१९ ते ०५.०५.२०१९)

| अंक ३५/२०१९ | दिनांक ३०.०४.२०१९ | कालावधी ५ दिवस |
|---|---|---|

| मागील आठवड्यातील हवामान घटकांची प्रत्यक्ष नोंद (२४/०४/२०१९ ते ३०/०४/२०१९ पर्यंत) | | | | | | | हवामान घटक | | पुढील पाच दिवसांचे हवामान घटकांचे पूर्वानुमान (वैधता ०१/०५/२०१९ ते ०५/०५/२०१९ पर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २४/०४ | २५/०४ | २६/०४ | २७/०४ | २८/०४ | २९/०४ | ३०/०४ | दिनांक | | ०१/०५ | ०२/०५ | ०३/०५ | ०४/०५ | ०५/०५ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मि. मी) | | ० | ० | ० | ० | ० |
| ३९.० | ३९.० | ३९.० | ३८.० | ३७.० | ३७.० | ३६.० | कमाल तापमान (अं. से) | | ३६ | ३६ | ३६ | ३६ | ३५ |
| २४.० | २४.० | २५.० | २५.० | २६.० | २६.० | २६.० | किमान तापमान (अं. से) | | २६ | २६ | २५ | २६ | २६ |
| निरभ्र | निरभ्र | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | सकाळ | मेघाच्छादन (ऑक्टा.) | ७ | ८ | ८ | ८ | ५ |
| निरभ्र | निरभ्र | निरभ्र | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | | दुपार | | | | | | |
| ९२ | ८० | ८४ | ८४ | ८५ | ८८ | ८९ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | | ९० | ८८ | ८९ | ८६ | ८९ |
| ५३ | ४५ | ५३ | ४९ | ४८ | ५२ | | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | | ४५ | ४१ | ३७ | ३७ | ४७ |
| ०.४ | ०.४ | ०.२ | ०.७ | ०.५ | ०.७ | ०.५ | वा-याचा वेग (कि.मी/तास) | | ००४ | ००७ | ००५ | ००५ | ००५ |
| स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | सकाळ | वा-याची दिशा | दक्षिणे कडून | नैऋत्य कडून | आग्नेये कडून | नैऋत्य कडून | दक्षिणे कडून |
| दक्षिणे | पुर्वे | पुर्वे | दक्षिणे | पुर्वे | दक्षिणे | | दुपार | | | | | | |

| मागील वर्षातील (२०१८) पर्जन्य (मि. मी) | १/०१/२०१९ पासूनचे पर्जन्य (मि. मी) | १/०६/२०१९ पासूनचे पर्जन्य (मि. मी) | मागील आठवड्यातील पर्जन्य (मि.मी) |
|---|---|---|---|
| ३२६९.२ | ०.० | ०.० | ०.० |

**पुढील ५ दिवसाच्या हवामानाची सामान्य स्थिती:** फनी चक्रीवादळामुळे वातावरण ढगाळ राहुन तापमानात घट होण्याची शक्यता आहे.

## हवामान पुर्वानुमान कृषि सल्ला

| पिकाचे नाव | पिकाची अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| आंबा | काढ्णी व नवीन लागवड | आंबा लागवडीसाठी निवडलेल्या क्षेत्रातील झाडे झुडपे तोडुन जमिन स्वच्छ करावी.<br>पावसाळा सुरु होण्यापुर्वी एप्रिल मे महीन्यात १०x१० मीटर अंतरावर १x१x१ मीटर आकाराचे खड्डे खणुन ते चांगली माती आणि ३-४ घमेली कंपोस्ट किंवा शेणखत आणि ३ किलो सुपर फॉस्पेट या मिश्रणाणे भरुन तयार ठेवावेत.<br>नवीन आंबा लागवडीमध्ये रोपांचे ऊष्णतेपासुन संरक्षण करण्यासाठी शेडनेटचे आच्छादन करावे. तसेच रोपांना पाणी देउन अळ्यांमध्ये पालापाचोळा, भाताचे तुस किंवा गवत यांचे आच्छादन करावे.<br>पाण्याची उपलब्धता असल्यास झाडांना विस्तारानुसार प्रति झाड १५०-२०० लि. पाणी १५ दिवसांच्या अंतराने द्यावे. बाष्पीभवन कमी करण्यासाठी जांभा जमिनीमधील आंबा कलमांना गवताचे आच्छादन द्यावे.<br>जिल्ह्यामध्ये आंबा पीकामध्ये काही ठिकाणी अंडाकृती फळे व मोठया आकाराची काढ्णीची फळे अशी अवस्था आहे. तयार फळे सकाळी दहाच्या अगोदर व दुपारी चारच्या नंतर नुतन झेल्याच्या सहाय्याने ८० ते ८५ टक्के (चौदा आणे) पक्वतेला काढावीत. काढलेली फळे साका टाळण्यासाठी व उष्णतेपासुन बचाव करण्यासाठी सावलीत ठेवावीत. शिफारसीनुसार बुरशीनाशकाची व ईथीलीनची प्रक्रिया देवुन पिकवावीत. शक्यतो आंब्याची वाहतुक रात्रीच्यावेळी करावी. |
| काजु | नवीन लागवड | काजुची लागवड कलमे लावुन करतात. एप्रिल किंवा मे महीन्यात ७x७ मीटर किंवा ८x८ मीटर अंतर ठेवुन खडडे खोदावेत.<br>हेक्टरी १५५-२०० झाडे बसतात. खड्ड्याची लांबी, रुंदी, खोली ०.६x०.६x०.६ मीटर असावी.<br>खड्ड्यात दीड ते दोन घमेली चांगले कुजलेले कंपोस्ट, १/२ किलो सिंगल सुपर फॉस्फेट किंवा हाडाची पुड मातीत मिसळावी.<br>वाळवी नियंत्रणासाठी २% मिथिल पॅराथिऑन ५० ग्रम भुकटी प्रति खड्ड्यात टाकावी.<br>जमिनीतील ओलावा टिकवुन ठेवण्यासाठी नवीन लागवड केलेल्या झाडांच्या अळ्यात पालापाचोळा, भाताचे तुस किंवा गवत यांचे आच्छादन करावे. |
| दुभती जनावरे, शेळ्या, कुक्कुटपालन | - | जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ थंड पाणी व उपलब्ध असल्यास खाण्यासाठी हिरव्या ओल्या चा-याची व्यवस्था करावी.<br>दिवसाचे कमाल तापमान वाढत असल्याने कोंबड्यांचे ऊष्णतेपासुन संरक्षण करण्यासाठी शेडला बाहेरुन पडदे लाऊन त्यावर पाणी शिंपडावे. तसेच शेडच्या छतावर गवताचे किंवा गोणपाटाचे आच्छादन घालावे व त्यावर पाणी शिंपडावे. कोंबड्यांना तसेच पिल्लांना पिण्यासाठी स्वच्छ गार पाण्याचा पुरवठा करावा. |
| माती परिक्षण | - | पिकांच्या काढणीनंतर पिकांची धसकटे, पालापाचोळा, गवत ईत्यादी शेतामध्ये जाळु नयेत, जाळले असता जमिनीतील पिकांच्या पोषण द्रव्यांचा -हास होतो व जमिनीची सुपीकता कमी होते.<br>जमिनीतील नत्र, स्फुरद व पालाशाचे प्रमाण तपासण्यासाठी खरीप पीकाची काढणी केल्यानंतर लगेचच मातीचा नमुना घ्यावा व तपासणीसाठी जवळच्या माती परीक्षण प्रयोगशाळेकडे पाठवावा. मातीचा नमुना कसा घ्यावा याबाबत अधिक माहितीसाठी मृद शास्त्रज्ञ, प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ला यांचेकडे संपर्क साधावा. (दुरध्वनी क्र. ०२३६६-२६२२३४) |
| सागरी मासेमारी | - | फनी चक्रिवादळ ३ ते ४ मे, २०१९ रोजी आंध्रप्रदेश व ओडीशा किनारपट्टीवर धडकण्याची शक्यता असल्यामुळे हवेचा वेग वाढला असुन वातावरण ढगाळ आहे. तसेच बंगालच्या उपसागराबरोबर दक्षिण, पुर्व व मध्य अरबी समुद्राची मध्यम ते जास्त खवळलेली स्थिती असल्यामुळे खोल समुद्रात मासेमारी करण्यास न जाण्याचा सल्ला भारतील हवामान शास्त्र विभागाकडुन मच्छीमारांना देण्यात येत आहे. |

सदर कृषि सल्ला पत्रिका ही डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या, प्रादेशीक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले व उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे येथील "ग्रामीण कृषि मौसम सेवा" योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशी वरुन तयार करुन प्रकाशित करण्यात आली.


| डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर<br>सहयोगी अधिष्ठाता<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग | डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर<br>सहयोगी संशोधन संचालक/नोडल ओफिसर<br>(ग्रामिण कृषि मौसम सेवा)<br>प्रा.फ.सं.कें. वेंगुर्ले, जि. सिंधुदुर्ग<br>(०२३६६-२६२२३४, २६२६९३) | डॉ. यशवंत चं. मुठाळ<br>तांत्रिक अधिकारी<br>ग्रामिण कृषि मौसम सेवा<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>(०२३६२-२४४२३१) |
|---|---|---|